प्रसिद्धी विभाग

शैक्षणिक वर्ष २०१९ – २०

**ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील साहेब वाढदिवस उपक्रम**

लोकमत

# राजगुरुनगरमध्ये विद्यार्थ्यांची मोफत आरोग्य तपासणी

लोकमत न्यूज नेटवर्क

राजगुरुनगर : खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे विद्यमान अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे-पाटील यांच्या सन्मानार्थ ॲड. देवेंद्र बुट्टेपाटील मित्र परिवाराच्या वतीने विश्व हिंदू परिषद संचलित, वनवासी विद्यार्थी वसतिगृह, राजगुरुनगर येथील विद्यार्थ्यांची मोफत आरोग्य तपासणी व मार्गदर्शन शिबिराचे आयोजन करण्यात आले.

यावेळी डॉ. सुरेश गोरे यांनी आरोग्याविषयी मार्गदर्शन केले. डॉ. अमृता कहाणे, सुनिता नांगरे यांनी आरोग्य तपासणीसाठी सहकार्य केले. शिबिरात रक्तगट, हिमोग्लोबीन, शुगर, हिमोग्राम, पोटाचे विकार, त्वचाविकार आदी तपासण्या करण्यात आल्या. विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अभ्यासाबरोबरच नियमितपणे व्यायाम, सार्वजनिक स्वच्छता, योग, चिंतन, मनन इत्यादी विषयावर डॉ.गोरे यांनी सखोल माहिती दिली.

बुट्टेपाटील मित्र परिवारातर्फे दरवर्षी या वसतिगृहात विविध उपक्रम राबविले त्या साठी वसतिगृह अधिक्षक अमोल डमरे यांचे मोलाचे सहकार्य असते. या कार्यक्रमाचे आयोजन योगेश बोऱ्हाडे, संतोष मुळूक, महेश माळशिकारे यांनी केले. कुलदीप वाळुंज व ओंकार भास्कर उपस्थित होते. सूत्रसंचालन आनंदा अंकुश यांनी केले. अमोल शिंदे यांनी आभार मानले.

Hello Pune Gramin
Page No. 4 Nov 20, 2019
Powered by: erelego.com

डॉ. संजय शिंदे

प्रसिद्धी विभाग प्रमुख